
# पोलीस कायदा अटक



**संपूर्ण भारतीय दंड संहितेतील (I.P.C.) अपराधांची वर्गवारी**

**अटक कशाला म्हणतात ? जामीन म्हणजे काय ?**
**अटकपूर्व जामीन - एक असाधारण हक्क**
**पोलीस कोठडी - न्यायालयीन कोठडी**
**खबरी रिपोर्ट (F. I. R.) - N. C. करणे इ.**

ॲड. अरुण गोविंद देशमुख

क्रीडाशिक्षक, श्री समर्थ व्यायाम मंदिर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई.

Scanned by CamScanner

## मनोगत...

सामान्यपणे साधारण नागरीक हा पोलीस-वकील-कोर्ट-कचेऱ्यांपासून नेहमीच चार हात ठेऊन चालत असतो. स्वत:ची समाजातील प्रतिष्ठा प्राणपणाने जपत असतो. ह्याच गोष्टीमुळे त्याला त्याच्याकडे असणारे नागरी हक्क याबाबत कोणतीच माहिती नसते. जसे ऑपरेशन म्हटले म्हणजे बहुतेकजण हा शेवटच्या प्रवासास निघाला आहे... असे गृहित धरतात. तसेच काहीसे पोलीस स्टेशनमध्ये एकाला बोलावले आहे असे कळले की त्याला गुन्हेगार समजायला लागतात. मात्र हा बालीशपणा आहे. आपल्याला जर सामान्य कायदाही माहित नसेल तर या जगातले अनेक ठकसेन आपल्याला लुबाडण्यासाठी तयारीतच असतात. आणि म्हणून भले अटक होणार नसली व तुम्ही कोणताही कायदा मोडणार नसला तरी " पोलीस-कायदा-अटक " या बाबतीत माहिती ठेवणे हे प्रत्येक नागरीकाचे कर्तव्य ठरते.

मी व्यवसायाने वकील असल्याने आजुबाजूस चालणाऱ्या अनेक बऱ्या-वाईट गोष्टी जवळून पाहत असतो. जेव्हा पोलीस स्टेशनमध्ये चौकशीसाठी कोणाला पाचारण केले की त्याला मुद्दामहून ताटकळत ठेवणे व त्याचे संतुलन बिघडवणे असे चालते. " मोठे साहेब आले आहेत त्यांच्यापासून शिपाई पर्यंत काही चिरीमिरी द्यावी लागेल, लवकर काय ते सांगा म्हणजे सोडवण्याचा प्रयत्न करतो " असा हळूच वर्दीतील एक सुचवतो... आणि मग उपलब्ध नातेवाईक शेजाऱ्यांकडून उसने घेत घरचे त्याला गुन्ह्याच्या व्याप्तीनुसार २,०००/- ते १०,०००/- ऐवढे पैसे मोजून सोडवून आणतात ! यात गंमत म्हणजे पोलीस रेकॉर्डला नोंद न करण्यासाठी हे पैसे मोजले असल्याने कोणतीही पावती मिळत नाही व सरकारी तिजोरीतही हा पैसा जात नाही. ही सोपी पद्धत ( पैसे चारुन ) वापरुन शेपटावर निभावून गेल्याचे खोटे समाधान मात्र तत्सम पैसे मोजणाऱ्यास मिळते.

इथे कोणालाही मुद्दामून हिणवायचा माझा हेतू नाही. मात्र वरील घटना होण्यामागे जेवढा पोलीसांचा धाक सामान्यांना वाटतो त्यापेक्षाही कायद्याचे अज्ञान व त्यापासून पळून जाण्याची प्रवृत्ती ही आर्थिक पिळवणूकीस कारणीभूत ठरते.

Scanned by CamScanner

या पुस्तकामध्ये अटके संदर्भातील बहुतेक मुद्यांची माहिती मी दिली आहे. यात सामान्य नागरीकाचे अधिकार, अटक झालेल्याचे अधिकार पासून अटकपूर्व जामीनापर्यंतची माहिती या पुस्तकात संकलीत केली आहे. सदर विषय मनोरमाचे प्रकाशक श्री. अनिल फडके यांनी माझ्यापुढे ठेवला व त्यास होकार देऊन त्याबाबत मी प्रामाणिक प्रयत्न केला आहे असे आपणास जाणवेल.

व्यवसायाने वकील असूनही या अगोदर आरोग्य व क्रीडाविषयक आठ पुस्तके मनोरमा प्रकाशनातर्फे प्रकाशित झालेली होती; त्यामुळे अनेकजण कुतूहलाने विचारायचे आता वकीलीविषयावर कधी लिखाण करणार ? अशा सर्व मित्रांचा अपेक्षाभंग होऊ नये म्हणूनच की काय हा योग लवकर दैवाने जुळवून आणला असे मला वाटते.

या पुस्तकाचे मुद्रणदोष श्री. अरविंद कर्वे ह्यांनी तपासले तसेच कु. विद्या पावसकर हिने तपासण्यात मदत केली असून आर्शिवादपर दोन शब्द ॲड. सुभाष कुलकर्णी सारख्या जेष्ठ वकीलांनी लिहीलेले असून त्याबाबत मी या सर्वांचा ऋणी आहे. माझे वकील होण्यासाठीचे घरातले वातावरण माझ्या वडीलांमुळे तयार झाले. आयुष्यभर जमीनजुमल्याबाबत त्यांचे चाललेले खटले व कळत नसतानाही अनेकवेळा त्यांनी ऐकवलेल्या खटल्यांबाबतची प्रगती मला सामान्य व्यक्तिच्या दुखऱ्या नसेची सेवा करण्यासाठी आकर्षित करुन गेली. माझ्या दिवंगत वडीलांना माझा मनापासून प्रणाम.

शेवटी पुस्तक लिखाण हा एक योग आहे, असे मी मानतो. आपण सर्वजण हे पुस्तक वाचून त्याचा जास्तीत जास्त फायदा घ्याल अशी मनापासून खात्री वाटते. या पुस्तकात जर काही त्रुटी आढळल्यास त्या आपण जरुर कळवा म्हणजे पुढील आवृत्तीच्यावेळेस योग्य बदल करता येतील. आपण वाचकांचे माझ्यावर असणारे हे प्रेम असेच वृद्धींगत होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. हरि ओम.

ॲड. अरुण गोविंद देशमुख
४७/नवी पोपटलाल बिल्डींग,
१ला मजला, कॅनरा बँकेजवळ,
रानडे मार्ग, दादर, मुंबई - २८

Scanned by CamScanner

## अनुक्रमणिका

अ) अटक ———————————————— १५-३७

१. अटक कशाला म्हणतात ?

२. अटक कोणाला करता येते ?

i) पोलीस वॉरंटशिवाय कधी अटक करु शकतात. ( कलम ४१,४२,१५१ व ४३२(इ)

ii) सामान्य नागरीकास अटक करण्याचे अधिकार ( कलम ४३ )

iii) दंडाधिकारी यांना अटक करण्याचे अधिकार ( कलम ४४ )

३. अटक कशी करावयाची व त्याबाबतचे नियम ( कलम ४६ )

४. अटक झालेल्या व्यक्तिस असणारे मुलभूत हक्क.

५. अटकेसंदर्भात पोलीसांचे अधिकार व कर्तव्य.

६. अटक करताना पोलीस अधिकाऱ्यांना असणारे अतिरिक्त अधिकार.

७. अटक झाली असताना वकील नेमण्याचा व सल्ला घेण्याचा अधिकार.

८. अटक झालेल्या व्यक्तिची सुटका कशी व कधी होऊ शकते ?

ब) जामीन ————————————————— ३८-५५

१. जामीन ( Bail ) म्हणजे काय ?

२. जामीन कोणत्या प्रकरणात द्यावा ?... ( कलम ४३६ )

३. अजामीनपात्र अपराधाच्या बाबतीत जामीन केव्हा घेता येतो... ( कलम ४३७)

४. जामीन मंजूर करताना विचारात घेतल्या जाणाऱ्या बाबी.

५. जामीन केव्हा रद्द होऊ शकते.

६. जामीनाविषयी उच्च किंवा सत्र न्यायालयाचे अधिकार ( कलम ४३९ )

७. जामीन नाकारण्याची विविध कारणे.

८. दिलेला जामीन रद्द होण्यामागची विविध कारणे.

९. कलम ४३९ या जामीनासंबंधी उच्च व सत्र न्यायालयाच्या खास अधिकाराबाबतचे न्यायनिवाडे.

१०. जामीनाबाबत विविध न्यायालयातील महत्त्वपूर्ण निकाल.

क) अटकपूर्व जामीन ——————————— ५६-६०

१. अटकपूर्व जामीन ( Anticipatory Bail ) म्हणजे कांय ?

Scanned by CamScanner

२. अटकपूर्व जामीन - एक असाधारण हक्क...
३. अटकपूर्व जामीन मंजूर करताना पाहिल्या जाणाऱ्या बाबी.
ड) बंधपत्र — — — — — — — — — — — — — — — — — ६१-६८
१. बंधपत्र ( जातमुचलक्या, Suriety Bond ) म्हणजे काय ?
२. आरोपीचे व जामीनदाराचे बंधपत्र ( कलम ४४१ )
३. हवालतीतून अर्थात कोठडीतून मुक्तता ( कलम ४४२ )
४. अपुरा जामीन असल्यास पुरेशा जामीनाबाबतचा आदेश ( कलम ४४३ )
५. जामीनदाराची दायित्व मुक्तता ( कलम ४४४ )
६. मुचलक्याऐवजी अनामत रक्कम ( कलम ४४५ )
७. जेव्हा बंधपात्र दंडपात्र होते तेव्हाची प्रक्रिया ( कलम ४४६ )
८. बंधपत्र किंवा जामीनपत्र रद्द होणे ( कलम ४४६अ )
९. बंधपत्रबाबत इतर कलम.
इ) कायदेशीर स्थानबद्धता — — — — — — — — — — — — ६९-७९
१. कायदेशीर स्थानबद्धता ( रिमांड )
i) पोलीस कोठडी ( पोलीस कस्टडी रिमांड - PCR )
ii) न्यायालयीन कोठडी ( मॅजिस्ट्रेट कस्टडी रिमांड - MCR )
२. कलम १६७ बाबतचे जादाचे स्पष्टीकरण.
३. रिमांड अर्थात पोलीस कोठडीबाबत पोलीसांनी पाळावयाच्या गोष्टी
४. रिमांड अर्थात पोलीस कोठडीबाबत दंडाधिकाऱ्यांनी पाळावयाच्या गोष्टी
५. पोलीस कस्टडी रिमांड ( PCR ) केव्हा देतात.
६. पोलीस कस्टडी रिमांड ( PCR ) कोणत्या कारणांसाठी देत नाहीत.
७. पोलीस कोठडी ( रिमांड ) कसा मिळतो.
८. पोलीस कस्टडी रिमांड पोलीसांना कोणत्या कारणांसाठी मिळू शकतो.
९. पोलीस कस्टडी रिमांड पोलीसांना कोणत्या प्रसंगी दिला जात नाही.
१०. रिमांडसंबंधी मुंबई हायकोर्टाच्या मार्गदर्शक सूचना.
फ) इतर — — — — — — — — — — — — — — — — — ८०-८९
१. खबरी रिपोर्ट - First Information Report ( F.I.R. )
२. N.C. करणे - Non Cognizable offence registration
३. Framing a charge ( दोषारोपाची मांडणी करणे )
४. फौजदारी न्यायालये त्यांची वर्गवारी ( संक्षिप्त )

Scanned by CamScanner

५. पोलीस शिपाई ते अधिकारी वर्गवारी ( संक्षिप्त )

६. Criminal Investigation Department ( C. I. D. ) गुन्हे अन्वेषण खाते.

७. पोलीस वायरलेस

ग) भारतीय दंडसहिता ( अपराधांचे वर्गीकरण )

Indian Penal Code माहिती — — — — — — — — ९०-२०३

१. अपप्रेरणेचा अपराध

२. देशविरोधी अपराध

३. भूसेना, नौसेना व वायुसेना यासंबंधीचे अपराध

४. सार्वजनिक अशांतता व त्याबावतीतले अपराध

५. लोकसेवकांकडून किंवा त्यांच्या संबंधात घडणारे अपराध.

६. निवडणूकीसंबंधीचे अपराध.

७. लोकसेवकांच्या कायदेशीर प्राधिकाराचे अवमान.

८. खोटा पुरावा देणे व सार्वजनिक न्यायाच्या विरोधी अपराध.

९. नाणी व शासकीय मुद्रांक यासंबंधीचे अपराध.

१०. वजने, मापे यासंबंधीचे अपराध.

११. सार्वजनिक आरोग्य, सुरक्षितता, सभ्यता, सोय व नीतिमत्ता यांना बाधक असे अपराध.

१२. धर्मासंबंधात अपराध.

१३. मानवी शरीरास बाधक ठरणारे अपराध.

१४. मालमत्तेसंबंधी अपराध.

१५. दस्तऐवज व स्वामित्व चिन्ह या बाबतीतले गुन्हे.

१६. फौजदारीपात्र सेवा शर्तीचा भंग.

१७. विवाहासंबंधीचे गुन्हे.

१८. पती किंवा पतीचे नातेवाईक यांचे क्रूर वागणुकीचे गुन्हे.

१९. अब्रूनुकसानीचे अपराध.

२०. फौजदारीपात्र धाकटधपाशा, अपमान किंवा त्रास देणेविषयी अपराध.

२१. अपराध करण्याचे प्रयंत्न.

२२. अपराधांचे इतर कायद्याअंतर्गत वर्गीकरण.

Scanned by CamScanner



# विभाग अ - अटक ( Arrest )

## १) अटक कशाला म्हणतात ?

सामान्य भाषेत बोलायचे तर ज्यास अटक झालेली आहे त्याचे व्यक्तिस्वातंत्र्य त्याच्यापासून हिरावून घेणे म्हणजे त्यास अटक करणे.

अटक सामान्यत: दोन गोष्टींसाठी केली जाते. एक म्हणजे सदर व्यक्तिने काही गुन्हा केला असल्याने वा संशय असल्याने त्याला पकडून दंडाधिकाऱ्यांसमोर पुढील आदेशासाठी हजर करण्यासाठी किंवा दुसरे म्हणजे सदर व्यक्तिकडून काही गुन्हा होण्याची शक्यता आहे किंवा तशी माहिती मिळाली आहे किंवा काही बेकायदेशीर कृत्य त्या व्यक्तिकडून घडण्याचा संशय असल्यास त्याला सदर बेकायदेशीर कृत्य वा गुन्हा करण्यापासून परावृत्त करण्यासाठी अटक करता येते.

कायद्यात ' अटक ' या शब्दास व्याख्या दिलेली नाही. मात्र काय घडल्यावर अटक झाली असे मानावे याबद्दलचे मतप्रदर्शन सर्वोच्च न्यायालयाने केलेले आहे. ज्यात " एखाद्या नागरीकाने जर काही गुन्हा केला आहे म्हणून त्याच्याविरुद्ध तक्रार केलेली असल्यास व त्याचा परिणाम म्हणून त्याच्यावर शारीरिक बंधने आणली गेली असल्यास त्यास अटक म्हणावे " असे म्हटलेले आहे. (AIR 1953)

अटक कोणीही करु शकतो. मात्र अशी अटक झाली आहे असे म्हणण्याकरता ज्या व्यक्तिला पकडले जाते किंवा स्थानबद्ध करुन ठेवले जाते त्यास कायद्याचा आधार लागतो.



Scanned by CamScanner

आणि म्हणूनच आपणास अटक करणारा कोण आहे व त्याला त्याबाबतचे नक्की अधिकार किती आहे हे माहित करुन घेणे आवश्यक ठरते.

अटक म्हणजे बेड्या घातल्या म्हणजेच होते हा गैरसमज आहे. कायदा उलट प्रत्येक नागरीकाचा गुन्हा सिद्ध होत नाही तिथंपर्यंत प्रतिष्ठा जपण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करतो. कायदा असे सांगतो की जरी मोठा गुन्हा घडला आहे पण गुन्हा करणारा नागरीक प्रतिष्ठीत असेल व त्याने स्वत:हून पोलीस ठाण्यात येण्याची तयारी दाखविल्यास व सदर व्यक्ति पळून जाण्याची शक्यता नसल्यास त्यास स्पर्शही न करता पोलीस ठाण्यात स्वत:बरोबर घेऊन जातात. कायदा सांगतो अशा व्यक्तिने वाहनखर्च उचलण्याची तयारी दाखविल्यास त्याला गाडीतून पोलीस ठाण्यात नेता येते. त्यामुळे सदर व्यक्तिचे अब्रुचे धिंडवडे उडण्याचे टाळले जाते. कायदा हा गाढव आहे असे म्हणणारे हे विसरतात की आपला कायदा हा सुशिक्षितांचा आहे. यात विचार आहे, मुलभूत मानवी हक्कांचे रक्षण करण्याची इच्छा आहे. त्यामुळेच जिथंपर्यंत आरोप सिद्ध होऊन दंड होत नाही तिथंपर्यंत गुन्हा करणाऱ्यास गुन्हेगार ठरविले जात नाही. त्यास आरोपी म्हटले जाते.

आता आपण पाहूया अटक कोणाला करता येते...

## २) अटक कोणाला करता येते ?

भारतीय कायदेनुसार खालील तीन व्यक्तिंना अटक करण्याबाबत अधिकार दिलेले आहेत.

i) कोणताही पोलीस अधिकारी ( फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम क्र. ४१(१), ४१(२), १५१ व ४३२(३) अन्वये )

ii) सामान्य नागरीक ( फौजदारी प्र. सं. १९७३ च्या कलम ४३ अन्वये)

iii) दंडाधिकारी ( फौजदारी प्र. सं. १९७३ च्या कलम ४४ अन्वये )

वरील सर्व अटक हे वॉरंट नसतानाही करण्याबाबतचे असून सदर अटक कधी व कोणत्या गोष्टींसाठी करता येते हे आता आपण पाहूया.



Scanned by CamScanner

i) पोलीस वॉरंटशिवाय खालील गोष्टींच्या वेळेस अटक करु शकतील.

I) ( कलम ४१(१) अन्वये ) प्रथम कोणताही पोलीस अधिकारी खालील वेळेस अटक करु शकेल.

अ) ज्या व्यक्तिचा दखलपात्र अपराधाशी संबंध आहे अथवा त्याबाबत जिच्याविरुद्ध वाजवी फिर्याद करण्यात आली आहे किंवा तशी विश्वसनीय खबर मिळालेली आहे किंवा जिचा वाजवी संशय आल्यास...

ब) एखाद्या व्यक्तिकडे घरफोडीचे हत्यार मिळाले असल्यास व तसे ते ठेवण्याबाबत कोणतीही कायदेशीर सबब नसल्यास यात कोणतीही दिलेली सबब सिद्ध करावी लागते.

क) ज्या व्यक्तिला फौजदारी प्रक्रिया संहितेखाली किंवा राज्य शासनाच्या आदेशाद्वारे अपराधी म्हणून उद्‌घोषित करण्यात आले असल्यास.

ड) ज्या व्यक्तिकडे चोरीची मालमत्ता म्हणून वाजवी संशय घेता येईल अशी कोणतीही गोष्ट आढळल्यास किंवा अशा वस्तूसाठी सदर व्यक्तिने अपराध केला असल्याचा वाजवी संशय आल्यास.

इ) आपले कर्तव्य बजावीत असताना पोलीस अधिकाऱ्यास जी व्यक्ति अडथळा आणते किंवा जी व्यक्ति कायदेशीर हवालतीतून निसटली आहे किंवा निसटण्याचा प्रयत्न करीत असल्यास.

फ) जी व्यक्ति संघराज्याच्या सशस्त्र सेनादलांपैकी कोणत्याही सेनादलातून पळून आली असल्याचा वाजवी संशय आल्यास.

ग) ज्या व्यक्तिने असे कृत्य केले असेल जे भारतात केले असते तर गुन्हा ठरले असते व असे कृत्य संबंधीताने भारताबाहेर केले असल्यास किंवा त्याबाबत कोणी तशी फिर्याद दिली असल्यास किंवा विश्वसनीय खबर असल्यास किंवा तसा वाजवी संशय आल्यास.

ह) ज्या व्यक्तिने दोषी ठरुन भा. दंड. संहिता कलम ३५६(५) प्रमाणे ज्याने तरतूद केली असताना त्या कलमातील नियमांचा भंग करताना आढळल्यास.

य) ज्या व्यक्तिबाबत दुसऱ्या पोलीस ठाण्यातून सदर व्यक्तिबाबत अटकेकरीता लेखी अथवा तोंडी मागणी केली असल्यास



Scanned by CamScanner